Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# चाळीसगाव तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळेतील समस्यांचा अभ्यास

**श्री. प्रशांत बळीराम लवंगे,** संशोधक, अनुदानित आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा खडकी बु., तालुका. चाळीसगाव जिल्हा. जळगाव

**प्रा. डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे,** मार्गदर्शक, विभाग प्रमुख (शिक्षणशास्त्र) बी. पी. आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स, के. के. सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव

**सारांश**

राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी जनतेची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची स्थापना करण्यात आली. या आश्रमशाळा स्थापन झाल्या व उद्देश पूर्वीच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली परंतु या आश्रमशाळांमध्ये विविध समस्या आहेत.

**प्रस्तावना**

राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी जमातीतील जनतेची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन १९७२-७३ पासून क्षेत्र विकासाचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. अशा भागाचा मूलभूत विकास व्हावा आणि त्याचा फ़ायदा सर्वांना व्हावा यासाठी तेथे मुळ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा असावी हा योजनेचा मुख्य उद्देश होता.

आदिवासी समाजाची प्रमुख लक्षणे विशिष्ट भूप्रदेश, स्वतःची बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव, प्रमाण लघुता, स्वतःची वेगळी संस्कृती, एकाच रक्तसंबंधांवर आधारित, साधी अर्थव्यवस्था, सिमित तंत्रविद्या, समान धर्म, सामाजिक एकजीनसीपणा ही आहेत. महाराष्ट्र राज्यात भिल,गोंड, वारली, कोळी, ठाकूर, दुबळा, बैगा, गढवा, कमार, खाडिया, खोड, कोल, कोलाम, कोरकू, कोरवा, मुंडा, उरॉव, परधान, वाघारी, पावरा या जाती आढळतात. महाराष्ट्र राज्यात एकूण लोकसंख्येच्या ८.८५% आदिवासी लोकसंख्या आढळते.तर जळगाव जिल्हयात भिल, पावरा, महादेव कोळी ,ढोरकोळी, कोकणी, टोकरे कोळी, नाईकडा, धानका या जाती आढळतात. जळगाव जिल्हयांत एकूण लोकसंख्येच्या ११.८४% आदिवासी समाज आढळतो.

आदिवासींच्या साक्षरतेचे. महाराष्ट्रातील आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या खाली ४१.७०%, माध्यमिक शिक्षण, १३.६%, तांत्रिक शिक्षण पदवीका 0.२ % तर पदवीधर व वरील २.१ % आहे.आदिवासींच्या विकासासाठी शैक्षणिक विकासासाठी विविध योजना आखल्या गेल्या. त्यात आदिवासी आयुक्तालया अंतर्गत आदिवासी प्रकल्प स्थापन केले गेले. या प्रकल्पा अंतर्गत शासकिय व अनुदानित आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्या डोंगराळ भागात ५००० ते ७००० आदिवासी लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळा, आणि दुर्गम भागात २००० ते ३००० लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळा मंजूर करण्यात येते. आज आश्रमशाळांत इ १ ली ते इ १० वी व काही शाळांमध्ये इ ११ वी इ १२ वी पर्यंतचे वर्ग कार्यरत आहेत. राज्यात काही शासकिय तर काही अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्यात एकूण ५४७ शासकीय तर ५५६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. यात शासकीय आश्रमशाळांमध्ये एकूण २,९७,२१६ विद्यार्थी तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये एकूण


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२,१०,८७४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये शासन अन्नधान्य, मसाले, किराणामाल, दुध अंडी, केळी, फळे, शालेय गणवेश, खोबरेल तेल, आंघोळीचा साबन व कपडे धुण्याचा साबण, टूथपेस्ट, टूथब्रश, सॅनेटरी नैपकिन (मुलींसाठी), बुट, पायमोजे , रेनकोट, शालेय शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आलेली आहेत. आहार, कपडे, शालेय व इतर साहित्य शासनामार्फत पुरविण्यात येते. खरेदीसाठी वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित केले जातात. तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये शासनामार्फत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान दिले जाते.

**आश्रमशाळा**

**१) शासकिय आश्रमशाळा समुह योजना**

डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसुचित जमातीच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी मूळ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा स्थापण्यात आल्या. यात विदयार्थ्यांना 1 ली ते 10 वी पर्यंतचे शिक्षण सोबत निवास, भोजन, गणवेश,अंथरूण,पांघरूण,पुस्तके व इतर लेखन साहित्य शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.तर अलीकडच्या काळात महाडीबीटी अंतर्गत मुलांच्या खात्यावर पैसे जमा केले जातात.

**२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य**

आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी कार्यरत स्वेच्छा संस्थांना अनुदान दिले जाते. यात या विदयार्थ्यांना निवास,भोजन,गणवेश,शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफात उपलब्ध करून देण्यात येते.

नाशिक,ठाणे,अमरावती,नागपुर या विभागांमध्ये, एकूण ५२९ शासकिय आश्रमशाळा तर ५२८ अनुदानित आश्रमशाळा आहेत.तर जळगाव जिल्ह्यात आदिवासी प्रकल्प यावल अंतर्गत एकुण १७ शासकीय तर ३४ अनुदानित आश्रमशाळा आहेत.या आश्रमशाळात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यामिक असे तीन विभाग आहेत.यात माध्यमिक स्तर म्हणजे ८ वी, ९ वीं, १० वी चे विद्यार्थी होत.

या सर्व बाबी असतांना आज आश्रमशाळा विविध समस्यांनी ग्रस्त आहेत. शाळा विभाग व वसतीगृह विभाग वेगळे नाहीत म्हणजे एकत्र आहेत.पालकांची मानसिकता, अशिक्षितता,अनास्था, भौतीक सुविधांचा अभाव, शिक्षकांची मानसिकता, शासनाची अन्यायकारक धोरणे, शिक्षकांच्या रात्रपाळी, अनुदानित व शासकीय आश्रमशाळेत सावत्रपणाची वागणुक, आश्रमशाळांमध्ये कला, क्रिडा, संगित, संगणक शिक्षक नसणे, आश्रमशाळांची भौगोलिक ठिकाणे, स्वयंपाकासाठी लाकडांचा वापर, शौचालय पुरेसे नसणे त्यामुळे शौचालयाला बाहेर जाणे, अपघाताचे प्रमाण, भाषेची समस्या,आजारी विद्यार्थ्यांसाठी अशा अनेक समस्या आहेत.

या विविध समस्या प्रकाश झोतात आणणे हे उद्धीष्ट समोर ठेवून सदर संशोधन हाती घेतले आहे.

**समस्या विधान**

चाळीसगाव तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील समस्यांचा अभ्यास करणे .

**संशोधनाची गरज**

आदिवासी आश्रमशाळांमधील विविध समस्या शोधून त्यावर उपाययोजना करणे सोपे होईल

१) आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्या शोधल्यास त्या सोडविणे सोपे होईल.

२) पालकांची मानसिकता बदलण्यास मदत होइल.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

३ ) पालकांची अनास्था कमी होऊन ते मुलांना शाळेत पाठवतील.

४) शिक्षकांची मानसिकता बदलण्यास मदत होईल.

५) समस्या माहित झाल्या व सोडविल्या तर आश्रमशाळांचा विकास करणे सोपे होईल.

६) शिक्षकांची मानसिकता चांगली ठेवल्यास अध्ययन कार्य चांगले होईल.

७) शिक्षकांची मानसिकता चांगली ठेवल्यास वातावरण आनंददायी ठेवता येईल.

**संशोधनाचे महत्व**

जगामध्ये केले जाणारे प्रत्येक संशोधन हे महत्वाचे असते. कारण या संशोधनातून मानवी जीवनातील समस्या दूर होण्यासाठी मदत होतेच पण नवीन ज्ञानाचे क्षीतीजे देखील मोकळी होतात.यामुळे संशोधकास नवीन ज्ञान विकसीत करण्याची एक दिशा मिळते.प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येते.

१. आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्या शोधल्यास त्या सोडविणे सोपे होईल व त्यामुळे आश्रमशाळेचे नावलौकिक होईल.
२. शिक्षकांची मानसिकता बदलण्यास मदत होईल.मानसिकतेत बदल झाल्यास ते अध्यापनाकडे लक्ष देतील.
३. शिक्षकांची मानसिकता चांगली ठेवल्यास अध्ययन कार्य चांगले होईल.शाळेची गुणवत्ता वाढेल.
४. शिक्षकांची मानसिकता चांगली ठेवल्यास वातावरण आनंददायी ठेवता येईल.आनंददायी वातावरणामुळे शालेय वातावरण सुधारेल.

**कार्यात्मक व्याख्या**

१. चाळीसगाव तालुका -

चाळीसगाव तालुका हा जळगाव जिल्ह्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा तालुका आहे.तसेच शैक्षणिक दृष्ट्या प्रगत तालुका.

२. आदिवासी - भारतीय राज्यघटनेच्या कलम ९४२ (१) अनुसार अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी.

"एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

३. आश्रमशाळा – आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्थानिक संस्थांना आर्थिक अनुदान दिलेल्या आणि शासनाच्या अधिपत्याखाली चालणाऱ्या शासनमान्य आश्रमशाळा.

४. समस्या - समस्या म्हणजे अडचण.

**संशोधनाची उद्दिष्टे**

संशोधनाची **उद्दिष्टे** पुढील प्रमाणे आहेत.

१. शिक्षकांच्या मानसिकता नसण्याचा अभ्यास करणे.
२. शिक्षक व शिक्षिकांच्या मानसिकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानसिकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संशोधनाची गृहीतके**

१. आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्यांवर अनुदानाचा प्रभाव असतो.

२. आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्यांवर शासनाच्या धोरणांचा प्रभाव असतो.

३. आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्या आश्रमशाळा विकासावर प्रभाव असतो.

४. आदिवासी आश्रमशाळेतील विविध समस्यांचा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर प्रभाव असतो.

५. शासनाची सकारात्मक धोरणे आदिवासी आश्रमशाळेतील समस्या कमी करण्यास महत्त्वपूर्ण ठरू शकते.

**संशोधन परिकल्पना**

१. आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या मानसिकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

२. आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानसिकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**व्याप्ती**

सदरील संशोधनाची व्याप्ती ही जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्याशी संबंधित असून संशोधनात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचा समावेश करण्यात आला.

**मर्यादा**

सदरील संशोधन हे फक्त ही जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित व शासकीय आदिवासी आश्रमशाळांपुरते मर्यादित आहे.

**जनसंख्या**

प्रस्तुत संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळा त्यात अनुदानित ३ व शासकीय १ असे एकुण ४ आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ही संशोधनाची जनसंख्या आहे.

**न्यादर्श**

प्रस्तुत संशोधन हे आश्रमशाळेवर केले जाणार आहे. सदर संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्याशी संबंधित असून यातील २० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण, संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात स्वनिर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचे निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण करून त्यानुसार निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

१. आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या मानसिकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून आला.
२. आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानसिकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून आला.
३. शिक्षकांच्या मानसिकता नकारात्मक आढळून आली.
४. शिक्षक व शिक्षिकांच्या मानसिकतेचा तुलनात्मक अभ्यास केल्यावर शिक्षिकांची मानसिकता नकारात्मक दिसून आली.
५. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानसिकतेचा तुलनात्मक अभ्यास केल्यावर शिक्षकांच्या मानसिकता नकारात्मक दिसून आली.
६. शिक्षक व शिक्षिका शालेय वेळ जास्त असल्याने मानसिकता नकारात्मक आढळून आली.
७. शिक्षक व शिक्षिका बदललेल्या वेळामुळे मानसिकता नकारात्मक आढळून आली.
८. शिक्षकाना रात्रपाळी असल्याने शिक्षकांची मानसिकता नकारात्मक आढळून आली.
९. शिक्षक व शिक्षिका नवीन वेळामुळे कोणतेही कामे होत नसल्याने तणावात आढळून आली.
१०. कर्मचारी मात्र नवीन वेळामध्ये आनंदी दिसली.
११. कर्मचारी नवीन वेळ बदलाबाबत नकारात्मक दिसून आली.

**शिफारशी**

१. आदिवासी आश्रमशाळेत शाळा व वसतीगृह विभाग स्वतंत्र असावा.
२. शिक्षकांच्या मानसिकता बिघडू नये अशी ध्येय धोरणे ठरविणे.
३. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये समानता असावी.
४. आश्रमशाळांची वेळ पूर्ववत ११ ते ५ करण्यात यावी.
५. शिक्षकांच्या रात्रपाळी रद्द कराव्यात. त्यासाठी वेगळी उपाययोजना करण्यात यावी.
६. शासकीय आश्रम शाळेतील शिक्षकांच्या बदल्या लांब करण्यात येऊ नये.

**संदर्भग्रंथ सूची**

१) http: // tribal.maharashtra.gov.in
२) http:// mahatribal. Gov.in/html docs/ ashram. htm.
३) शर्मा वि. (२०२१). आदिवासी शिक्षा, नई दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाउस.
४) खोडेवाड दे. (२०१८). महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन. औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स
५) आगलावे प्र. (२०१२). आदिवासी समाजाचे समाजशास्त्र. नागपुर: श्री साईनाथ प्रकाशन
६) रायपुरे वि.आणि देसाई सं. (२०१५ )आदिवासींची शैक्षणिक स्थिती.जळगाव:प्रशांत पब्लिकेशन.
७) रायपुरे वि.(२०१३)आदिवासी शिक्षणातील शासकीय योजना.जळगाव : प्रशांत पब्लिकेशन.
८) आश्रमशाळा सहिंता.
९) विश्वकर्मा विनोद : आदिवासी विमर्श और समकालीन हिंदी उपन्यास.
१०) चव्हाण मोहन : आदिवासी साहित्य विमर्श.


Copyright © | JET Network, All Rights Reserved